# अमरावती महानगरपालिका, अमरावती

## दिनांक 21.09.2023 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक 106 -** अमरावती महानगरपालिकेची उच्च प्राथमिक मराठी शाळा बुधवारा या शाळेचे स्थालांतरण करणे व इमारत शिकस्त असल्याने पाडण्याची परवानगी मिळणेबाबत.

**ठराव क्रमांक 106 -** अमरावती महानगरपालिकेची उच्च प्राथमिक मराठी शाळा बुधवारा येथे असून सदर इमारत हि 137 वर्ष जुनी असल्याने अतिशय जिर्ण झालेली आहे. त्यामुळे शाळेचे इमारतीचे नविन बांधकाम होणे आवश्यक आहे. तसेच शाळेचे स्थालांतरण करण्यात यावे याबाबत मुख्याध्यापक यांचे कार्यालयास पत्र प्राप्त झाले.त्यान्वये मनपाचे उपअभियंता श्री. पावडे यांनी सदर इमारतीचे पाहणी केली असता त्यांनी सदर इमारत दुरुस्त होवु शकत नाही.सदर इमारत पाडुन त्या ठिकाणी नव्या पध्दतीने बांधकाम करणे अत्यंत आवशयक आहे. सध्या स्थितीत सदर शाळा इमारत इतरत्र हलविणे अत्यंत आवशयक आहे. याबाबत संबधित उपअभियंता यांनी जागेची पाहणी करुन प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच त्यांनी सर्वसाधारण सभेचा ठराव घेवुन अतिक्रमण विभागाकडुन शिकस्त शाळा पाडण्याची कारवाई करण्यात यावी,असे नस्तीवर नमुद केलेले आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेचे मंजुरी करिता सादर करण्यात आला आहे परंतु,सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव**
**महानगरपालिका, अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक**
**महानगरपालिका, अमरावती**